# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:06.08.2024** **वार:मंगळवार**

---

1. पूरबाधितांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी समूह विकास करणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही
2. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला आव्हान देणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली
3. पुणे जिल्ह्यात झिकाच्या 72 रुग्णांची नोंद आणि
4. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताच्या अविनाश साबळेची ऐतिहासिक कामगिरी; पुरुषांच्या स्टीपलचेस स्पर्धेत अंतिम फेरीत धडक

**मुख्यमंत्री**

पूरबाधितांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनासाठी इमारतींच्या समूह विकासाचे प्रस्ताव सादर करावेत; त्याचबरोबर झोपडपट्टी पुनर्वसन योजना गतीने राबवाव्यात, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पुण्यात दिल्या. पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील पूरपरिस्थितीच्या अनुषंगाने झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, आरोग्यमंत्री तानाजी सावंत, यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. आगामी काळात पूरपरिस्थिती उद्भवू नये यासाठी विविध उपाययोजना कराव्यात, तसंच नद्यांमध्ये राडारोडा टाकून प्रवाहाला बाधा आणणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत असे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. प्रत्येक गावात पावसाचं प्रमाण, प्रवाहात येणारं पाणी, याबाबत माहिती समजावी यासाठी स्वयंचलित हवामान केंद्र स्थापन करावेत, पूरग्रस्त भागात तात्काळ सूचना देणारी प्रणाली कार्यान्वित करावी, अशा सूचना शिंदे यांनी दिल्या. या सर्व कामासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

**मुख्यमंत्री पुणे**

तत्पूर्वी काल मुख्यमंत्र्यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील पूरग्रस्त भागाची पाहणी करून आढावा घेतला. शिवाजी नगर इथं पाटील इस्टेट, पीएमसी कॉलनी, वाकडेवाडी, जुनी सांगवी, सिंहगड रस्त्यावर एकता नगर, खडकवासला या भागांना भेट देऊन पूरबाधित नागरिकांशी त्यांनी संवाद साधला. पुण्यातील पुराचा धोका दूर करण्याकरता कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी नवीन धोरण तयार करण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं. घरांच्या पुनर्विकासाकरता आवश्यकतेनुसार कायद्यात आणि नियमातही बदल करण्यात येईल, असं आश्वासन शिंदे यांनी दिलं.

**पंतप्रधान**

संसदेनं कलम 370 आणि 35 अ रद्द करण्याचा घेतलेला निर्णय म्हणजे जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये प्रगती आणि समृद्धीच्या नव्या पर्वाची सुरुवात होती असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. 370 कलम रद्द करण्याच्या निर्णयाला काल पाच वर्ष पूर्ण झाली; त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी काल समाज माध्यमावर संदेश प्रसारित केला.

**विनियोजन विधेयक**

केंद्रीय अर्थसंकल्पात विविध मंत्रालयांनी प्रस्तावित केलेल्या खर्चाशी संबंधित अनुदानाच्या थकबाकी मागण्या लोकसभेत काल मंजूर करण्यात आल्या. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या विनियोजन विधेयकालाही सभागृहानं मंजुरी दिली.

**राज्यसभा-वाण**

विविध पिकांचे दीड हजार पर्यावरणस्नेही वाण येत्या 5 वर्षात उपलब्ध करुन देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून अशा 109 वाणांचं लोकार्पण लवकरच पंतप्रधानांच्या हस्ते होणार असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी काल राज्यसभेत सांगितलं.

**<u>लंके दूध</u>**

अर्थसंकल्पात दुग्धव्यवसायाला सहाय्य करण्यासाठी उपाययोजनांची गरज अहमदनगरचे खासदार नीलेश लंके यांनी काल लोकसभेत व्यक्त केली. पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यपालन विभागाच्या अनुदान मागण्यांवरच्या चर्चेत त्यांनी या विषयाकडे लक्ष वेधलं. दुधाच्या उत्पादन खर्चावर बाजारभाव ठरावा, दुधाला किमान हमीभाव मिळावा, तसंच आवश्यक पायाभूत सुविधांसाठी वाढीव निधीसह अन्य उपाययोजना करण्याची मागणी लंके यांनी केली.

**<u>महाडीक</u>**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न सन्मान द्यावा अशी मागणी खासदार धनंजय महाडीक यांनी काल लोकसभेत केली.

**<u>याचिका फेटाळली</u>**

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजने'च्या धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेप करता येणार नाही, असं मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. ही योजना सर्वसामान्य करदात्यांच्या पैशांचा अपव्यय असल्याचा आरोप करत या योजनेविरोधात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र ही योजना म्हणजे सरकारनं अर्थसंकल्पाच्या अंतर्गत घेतलेला निर्णय आहे, त्याला आव्हान कसं देता येईल, असं म्हणत न्यायालयानं या योजनेच्या विरोधातील याचिका फेटाळली.

**<u>अदिती तटकरे</u>**

दरम्यान, केवळ विरोध म्हणून या योजनेला देण्यात आलेलं आव्हान उच्च न्यायालयाने फेटाळल्यानं या योजनेची विश्वासार्हता अधिकच वाढली आहे, असं मत महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी एक्स समाज माध्यमावर व्यक्त केलं आहे.

**<u>झिका</u>**

पुणे जिल्ह्यात झिकाचा प्रादुर्भाव वाढत आहे. आत्तापर्यंत 72 जणांना झिकाची लागण झाली असून, यातले 65 रुग्ण पुणे शहरातील आहेत. नुकत्याच आलेल्या तपासणी अहवालात पाच गर्भवती महिलांना झिका झाल्याचं समोर आलं आहे. गर्भवती महिलांच्या बाळांच्या स्कॅनिंगचे अहवाल नॉर्मल आले असल्याची माहिती पुणे जिल्हा आरोग्य विभागानं दिली आहे. राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था आणि ससून रुग्णालयातून आणखी काही जणांच्या तपासणीचे अहवाल येणं बाकी आहे; ते आल्यानंतर झिका रुग्णांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे; त्यामुळे पुणेकरांनी काळजी घ्यावी, असं आवाहन पुणे महानगरपालिकेनं केलं आहे.

**<u>जनसन्मान-नाशिक</u>**

राष्ट्रवादी काँग्रेसची जनसन्मान यात्रा येत्या 8 ऑगस्टपासून नाशिकच्या दिंडोरी इथून सुरू होणार आहे. प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यात्रेचा पहिला टप्पा उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मुंबई आणि विदर्भ असा असून हा टप्पा 31 ऑगस्टला संपणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>राज ठाकरे- सोलापूर</u>**

राज्यात सामाजिक वातावरण कलुषित झालं असून, जातीय द्वेष निर्माण करणाऱ्यांना माध्यमांनी प्रसिद्धी देऊ नये, असं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. ते काल सोलापूर इथं पत्रकारांशी बोलत होते. मनसे आगामी विधानसभा निवडणूक लढवणार असून त्या अनुषंगानं निवडणुकीत किती आणि कशा जागा लढवायच्या हे ठरवण्यासाठी राज्यभर दौरा करणार असल्याचंही ठाकरे यांनी सांगितलं.

**<u>श्रावणी सोमवार</u>**

श्रावणी सोमवारनिमित्त काल पुण्यासह राज्यातील विविध शिवमंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी झाली होती. बीड जिल्ह्यातील परळी इथला वैजनाथ, वेरूळचा घृष्णेश्वर आणि पुणे जिल्ह्यातील भीमाशंकर या ज्योतिर्लिंग असलेल्या मंदिरात पहाटेपासूनच पूजाअर्चा,

अभिषेक सुरू होते. हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ मंदिरात रात्री बारा वाजण्याच्या सुमारास शासकीय महापूजा झाल्यानंतर भक्तांसाठी मंदिर खुलं करण्यात आलं. दर्शनासाठी भक्तांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या.

**<u>ऑलिम्पिक साबळे</u>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताच्या अविनाश साबळे याने काल ऐतिहासिक कामगिरी करत पुरुषांच्या 3 हजार मीटर स्टीपलचेस स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. महाराष्ट्रातील बीडचा सुपुत्र असलेल्या अविनाशनं काल रात्री झालेली ही शर्यत पाचव्या क्रमांकानं पूर्ण करत 8 मिनिट आणि 15 पूर्णांक 43 सेकंदांची वेळ दिली आणि अंतिम फेरीत आपलं स्थान पक्क केलं. येत्या 8 ऑगस्टला ही अंतिम फेरी होणार आहे. भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन याला मात्र काल कास्य पदकानं हुलकावणी दिली. नेमबाजीमध्येही मिश्र सांघिक प्रकारात महेश्वरी चौहान आणि अनंतजीत सिंह नरुका यांचं कास्य पदक अवघ्या एका गुणानं हुकलं.

**<u>पाऊस</u>**

राज्यात काल पावसाचा जोर काहीसा कमी होता; मात्र गेल्या काही दिवसात झालेल्या जोरदार पावसामुळे पाणीपातळी वाढल्यानं अनेक धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

नाशिकमध्ये गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असल्यामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. गिरणा नदीपात्रात मासेमारीसाठी गेलेल्या 15 मच्छिमारांची काल विशेष हेलीकॉप्टरनं सुटका केली. हे मच्छिमार रविवारी मुठा नदीमध्ये मासे पकडण्यासाठी गेले असताना गंगापूर धरणातून पाणी सोडल्यानं पूरपरिस्थिती निर्माण झाली होती.

धुळे शहरातील पांझरा नदीवरील अक्कलपाडा धरणातून काल संध्याकाळपासून पाण्याचा विसर्ग करण्यात येत असल्यानं पांझरा नदीला पूर आला आहे. फरशी पुल पाण्याखाली गेल्याने त्यावरील वाहतुक बंद करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्ह्यात उजनी धरण आणि वीर पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे धरणे शंभर टक्के भरली आहेत. या धरणांमधून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु आहे. त्यामुळे भीमा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत असल्यानं नदीकाठच्या नागरिकांना सतर्कता बाळगण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात येत्या 24 तासात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी, तर विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.